# नव्वोदत्तरी कादंबरीतील ग्रामीण स्त्री

डॉ. विनिता हिंगे
यशोदा गर्ल्स आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
नागपूर

---

नव्वदोत्तर काळखंड हा प्रामुख्याने खाजगीकरण जागतिकीकरण व उदारीकरण या धोरणामुळे प्रभावित झाला आहे. 1980 च्या दशकाच्या अखेरीस भारतीय अर्थव्यवस्था गंभीर संकटात सापडली होती. त्यामुळे 'आर्थिक पुर्नरचना' कार्यक्रम राबविण्यात आला. भारताचे आर्थिक धोरण खुले करण्यात आले. बहुराष्ट्रीय कंपन्या त्यामुळे केंद्रस्थानी आल्या. संगणक व दूरसंचार क्रांतीचा प्रचंड विस्तार झाला आणि समाजजीवनाची दिशा वेगाने बदलली. ग्रामीण जीवनावर याचा परिणाम दिसू लागला. याचे कारण गॅट कराराला भारताने मंजुरी दिली. भारतीय बाजारपेठ परदेशी मालाला खुली झाली.

जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडला जाऊन भारताची अर्थव्यवस्था सुधारेल ही अपेक्षा होती. परंतु विपरीत स्थिती अनुभवास आली. स्त्रियांच्या आर्थिक स्थिती बाबत विद्युत भागवत यांचे निरीक्षण उल्लेखनीय आहे. त्या लिहितात, स्त्रियांचे उदरनिर्वाहाचे पर्यायही नव्या अर्थव्यवस्थेत नष्ट होत आहेत. अपारंपारिक कृषि निर्यातीला महत्व आल्याबरोबर तेलबियांसाठी, सोयाबीन उत्पादनाच्या निर्यातीसाठी स्वस्त धान्यबियांचा वापर केला जातो. गरीब स्त्रियांच्या अन्नाच्या सुरक्षिततेवर हयातून घाला पडतो.[1]

ग्रामीण कादंबरीत समकालीन स्त्रीजीवनाचे प्रतिबिंब स्पष्ट दिसते. आर्थिक बदलांसोबत सामाजिक, कौटुंबिक जीवन अपरिहार्यपणे बदलते. त्याचे पडसाद मराठी कादंबरीत उमटलेले तीव्रतेने आढळते. सदानंद देशमुख यांच्या 'तहान' (1988) व बारोमास (2002) या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. ग्रामीण भागातील बिकट परिस्थितीतील 'रत्ना', जिला पाणी, साबन या गोष्टीही मिळत नाहीत. शीतपेये केवळ दूरचित्रवाणीवर पाहिली होती ती कोणी दिल्यास ती हुरळून जाणे स्वाभाविक आहे. बबन हा तरुण या गोष्टी देऊन तिचे सर्वस्वही लुटतो. बबनच्या घरात त्याची आई रामकोर, बहिण वर्षा या देखील घरात टी.व्ही, खाण्यास चमचमीत पदार्थ मिळाल्याने आनंदित होतात. गरिबीत राहतांना बबनने पाणी विकुन पैसा मिळवला, त्याने त्यासाठी बैलांना वेठीस धरले तरी त्या विचार करीत नाहीत. 'बारोमास' मधील 'अलका' शेतकऱ्याच्या अभावग्रस्त घरात राहू शकत नाही. ती माहेरी निघून जाते. शेतजुरी करणाऱ्या गुंपा मामी, मुक्ता यांची अवस्था दयनीय आहे. ग्रामीण स्त्रिला भेडसावणाऱ्या समस्या भीषण आहेत. मुलभूत गरजाही भागवल्या जात नाहीत. पती कर्जापायी कंटाळून आत्महत्येचा मार्ग पत्करतो. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' (2011) ही आनंद विंगकर यांची उल्लेखनीय कादंबरी. त्यातील पार्वती, उषा, आशा या संघर्ष करणाऱ्या स्त्रियां. पार्वतीचा पती आत्महत्या करण्यापूर्वी तिलाही आत्महत्या करण्यास भाग पाडतो. कष्टाने तिने संसार सांभाळला आहे. तिची मुलगी उषा मात्र धाडसी आहे. कष्टाने परिस्थिती बदलण्याची आशा तिच्या रुपात लेखकाने दाखवली आहे. गरीब पित्याने लहान वयातील मुलीचे शिक्षण थांबवून व्यंग असलेल्या मुलाशी विवाह लावून देणे यासारखे अनेक स्त्री प्रश्न या कादंबरीत उत्कटपणे मांडले आहेत. या संदर्भात डॉ.रणधीर शिंदे यांचे निरीक्षण उल्लेखनीय आहे. ''कादंबरीच्या या जीवनार्थाला गेल्या दोन–तीन दशकांचा कालावकाश कारणीभूत आहे. जागतिकीकरणाने जे अंतर्विरोध निर्माण केले आहेत, त्या अंतर्विरोधाच आणि दुष्टचक्रांचे

गडद असे सावट कादंबरीतील जगावर आहे. एका बाजूला गतिमान अशा जागतिकीकरणाच्या भुलभुलैय्याचे डांगोरे पिटले जात आहेत आणि दुसऱ्या बाजूला सार्वत्रिक अभावाचे कष्टप्रद दुःखाचे जग खेडयात आहे. आर्थिक स्थितीने गांजलेले विदारक जीवन या कादंबरीतून प्रत्ययाला येते. निसर्गाची अवकृपा आणि मानवी निर्णयांमुळे दुष्टचक्र याने ग्रामीण समाजावर आलेली अवकळा तसेच स्त्री ची दारुण स्त्री ही कादंबरी स्पष्टपणे दाखवते.

तरीही काही आशा दाखवणाऱ्या सुजाता, प्रज्ञा, शीला, धुरपाआत्या या शेतमजुरी करुन स्वावलंबी होणाऱ्या कष्टाळु, प्रामाणिक स्त्रिया याच कादंबरीत दिसतात. वडिलांनी आत्महत्या केलेली असली तरी अतीव दुःखाने शहाणी, समजुतदार वयाच्या मानाने प्रौढ झालेली 'उषा' ची व्यतिरेखा हे आशादायी चित्र आहे. ग्रामीण भागात शेतमजूर स्त्री, शेतकरी कुटुंबातील स्त्री व नोकरी करणाऱ्या स्त्री ची अवस्था कशी भिन्न आहे ते ग्रामीण कादंबरीने स्पष्ट केले आहे. दोन पिढयांतील स्त्रियांच्या मानसिकतेतील बदलही कादंबरी दाखवते.

बदलत्या आर्थिक स्थितीमुळे कौटुंबिक जीवन प्रभावित झाले आहे. 'बारोमास' मधील अलका, ''माझं करीयर आता मी निवडणार आहे' असे सांगून माहेरी जाते. नको असलेल्या संसारात अडकून पडत नाही. कविता महाजन यांच्या 'ब्र' या कादंबरीत आदिवासी स्त्रियांच्या समस्यांचा सूक्ष्मपणे विचार केलेला आहे. वीटभट्टीवर काम करणे, दारु गाळणे अशी अनेक कष्टाची कामे करणाऱ्या कणखर स्त्रियांचे जीवन दिसते. दारिद्रय, कष्ट, निसर्गाचे बदलते चित्र या सर्वांना ग्रामीण स्त्री धाडसाने सामोरी जाते हो. हा अनुभव अनेक लेखक मांडतात पारंपाति समजुती, पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा ग्रामीण जीवनावर अधिक असल्याचे चित्रण येते. पण ही स्त्री बदलते आहे, कधी चंगळवादाचे आहारी जाते आहे, हे वास्तवही मराठी कादंबरी मांडते. प्रतिमा इंगोले यांच्या 'बुढाई', 'बोडखी' या कादंबरीतही स्त्री जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण आढळते. स्त्री समस्यांचा वेध घेणाऱ्या कादंबऱ्या पुढे येत आहेत.

नव्वदोत्तर काळातील चाळीस वर्षातील स्त्री समस्या कादंबरीत येतात. त्यावर विचारमंथन करीत नवे मार्ग धुंडाळण्याचा प्रयासही केलेला आढळतो. खडतर परिस्थितीला कणखरपणे सामोरे जाणारी ग्रामीण स्त्रीचा चेहरा यातून समोर येतो. शेतीला कष्टाने सावरणारी, पतीला आधार देणारी ही स्त्री आहे हे निश्चितपणे यातून कादंबरीकारांनी दाखवले आहे.

संदर्भ :–


- विद्युत भागवत, जागतिकीकरण आणि स्त्रियां, स्त्री प्रश्नाची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे 2004, पृ. 3
- रणधीर शिंदे, 'समकालीन दुष्टचक्राचे अंतर्भेदी चित्रण, साधना, पुणे 12 जानेवारी 2013 पृ.30